# वारस किरकोळ दिवाणी अर्ज नं. १७३/२०२२ निशाणी १ वरील आदेश

(दिलावर इस्माईल शेख विरुध्द कोणी नाही)

CNR - MHST02-002189-2022

सदरचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. **अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की:**

अर्जदार यांचे आजोबा इसाक उर्फ पापामियाॅ शेख हे फार वर्षापुर्वी मयत झाले आहे. अर्जदार यांचे वडील म्हणजेच इस्माईल इसाक उर्फ पापामियाँ शेख हे दिनांक १४.०७.१९८५ रोजी सातारा येथेच मयत झाले आहेत तसेच अर्जदार यांची आई खातून इस्माईल शेख हे दिनांक २५.०४.२०१३ रोजी सातारा येथे मयत झालेली आहे. मयत इसाक उर्फ पापामियाँ शेख यांचे मृत्युचे पश्चात अर्जदार हेच नातू या नात्याने एकमेव कायदेशीर वारस आहेत.

३. अर्जदार यांचे कथन पुढे असे आहे की, सदरबझार सातारा येथील सि.स.नं. १८ याचे एकूण क्षेत्र १२०.४० चौ. मी. ही मिळकत मुळची इसाक उर्फ पापामियाँ, अब्दुल रज्जाक, बाबुमिया शेख यांचे मालकीची आहे. सदर मिळकतीचे सिटी सर्व्हेच्या रेकॉर्ड दप्तरी अद्याप मयत पापामियाँ शेख यांचे नावाची नोंद आहे. सदर मिळकतीचे सि.स.रेकॉर्ड दप्तरी अर्जदार यांनी मिळकत पत्रिकेवर वारस नोंद करणेबाबत दिनांक २९.०६.२०२२ रोजी अर्ज दिला असता अर्जदार यांना दिनांक १३.०७.२०२२ रोजी मा. न्यायालय यांचे वारस प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर मिळकतीमध्ये अर्जदार हे त्यांचे जन्मापासून व लग्न झाल्यानंतर पत्नी व मुलाबाळासह राहणेस असून अर्जात नमूद मिळकतीचा शासकीय कर, पाणीपट्टी, नगरपालिका कर असे भरणा करुन अर्जदार हे या मिळकतीचा वारस हक्काने उपभोग घेत आलेले आहेत. अर्जदार यांचे शिवाय मयत इसाक उर्फ पापामियाँ शेख यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. त्यामुळे अर्जदार यांचे

नावाची नोंद सि.स.चे रेकॉर्ड दप्तरी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज.

४. सदर प्रकरणात (निशाणी १४) दिनांक १४.१०.२०२२ रोजी दैनिक ''पुण्यनगरी'' या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करून हरकती मागविण्यात आलेल्या होत्या, परंतू, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेनंतर मुदतीत अर्जदार यांना वारस दाखला देण्यासंदर्भात कोणीही हरकत नोंदवली नाही. तसेच सदर कामी जाहीरनामा (निशाणी–११) अन्वये प्रसिध्द करण्यात आला आहे. अर्जदार यांनी सदर प्रकरणामध्ये त्यांचे स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र (निशाणी–१५) दाखल करून अर्जामधील सर्व कथने शपथेवर जशीच्या तशी सांगितली आहेत.

५. अर्जदार यांनी (निशाणी ६) वर अर्जदार यांचे सि.स.नं. १८ सदरबझार सातारा या मिळकतीचा मुळ उतारा, (निशाणी ७ व ८) वर अर्जदार यांचे वडीलांचे व आईचे मृत्युची नोंद असलेले मुळ मृत्यू प्रमाणपत्र, (निशाणी १६) अर्जदार यांना नगर भुमापन अधिकारी सातारा यांनी न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र सादर करणेबाबत दिलेले मुळ पत्र, (निशाणी १७) वर अर्जदार यांचे आधार कार्डची प्रमाणीत केलेले छायांकित प्रत, (निशाणी १८) वर अर्जदार यांचे सि.स.नं. १८ सदरबझार सातारा या मिळकतीचे कर थकबाकी नसल्याचे मुळ प्रमाणपत्र मुख्याधिकारी सातारा नगर परीषद यांचे पत्र, (निशाणी १९ व २०) वर अर्जदार यांनी सि.स.नं. १८ सदरबझार सातारा या मिळकतीची सन २०१८–२०१९ व २०२०–२०२१ ची मालमत्ता कर भरलेची मुळ पावती, (निशाणी २१) वर अर्जदार यांचे सि.स.नं. १८ सदरबझार सातारा या मिळकतीचे पहाणी पत्रकाची सातरा नगर परीषद सातारा यांची मुळ प्रत, (निशाणी २२ व २३) वर अर्जदार यांचे सि.स.नं. १८ सदरबझार सातारा यांचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण पाणी आकारणी कराचे भरलेल्या पावतीची मुळ प्रत, (निशाणी २४ व २५) वर अर्जदार यांचे सि.स.नं. १८ सदरबझार सातारा यांचे महाराष्ट्र विज बिलाची मुळ

पावती इत्यादी कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत. पुरावा बंद करण्याची पुरसिस (निशाणी २७) वर दाखल केलेली आहे.

६. अर्ज परिच्छेद २ मध्ये नमूद वंशावळीचे अवलोकन करता, मुळ पुरुष मयत इसाक उर्फ पापामियाँ यांना इस्माईल इसाक उर्फ पापामियाँ शेख हे अपत्य होते ते दिनांक १४.०७.१९८५ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जदार दिलावर इस्माईल शेख हे अपत्य असल्याचे दिसून येते. अर्जदार यांचा शपथेवरील जबाब व प्रकरणातील मूळ कागदपत्रे यांना कोणीही आक्षेप घेतला नसल्यामुळे ती पुराव्याचे कामी वाचण्यात आली आहेत. अर्जदारांचे पुराव्यास कोणीही आजअखेर आव्हानीत केलेले नसलेमुळे अर्जदार यांचे पुराव्यावर अविश्वास दाखविण्याचे काहीच कारण दिसून येत नाही. अर्जदार यांच्या अर्जातील कथने व दाखल कागदोपत्री पुराव्यावरून मयत इस्माईल इसाक उर्फ पापामियाँ शेख व खातून इस्माईल शेख यांचे मृत्यूनंतर अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदार यांचे नावे वारस दाखला देणे न्यायाचे दृष्टीने योग्य व उचीत होणार आहे. वरील सर्व बाबींचा विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उपलब्ध बाबीवरुन अर्जदार हे मयत इसाक उर्फ पापामियाँ शेख यांचे मृत्युचे पश्चात एकमेव कायदेशीर वारस असलेने, त्यांचे नावे वारस दाखला (Heirship Certificate) मंजूर करणेत येत आहे.

३. अर्जदार यांनी आवश्यक तेथे न्यायीक मुद्रांक व शुल्क दिलेनंतर वारस दाखला देणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

स्थळ : सातारा.
दिनांक : ०१.०२.२०२३.

(आर. एम. राठोड)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सातारा.